# अण्णा भाऊंच्या कवितेतील आंबेडकरी विचार

डॉ.रवींद्र वैजनाथराव बेम्बरे

प्रमुख मराठी विभाग

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर

या देशातील प्रस्थापित व्यवस्थेने हजारो वर्षापासून धर्म आणि परंपरेच्या नावाखाली येथील अनेक जातींना शूद्र ठरवून त्यांचे माणूसपण नाकारले होते. यामुळे पिढ्यानपिढ्या पासून अस्पृश्यत्वच्या वेदना येथील वंचितांच्या वाट्याला आल्या. गुलामगिरी, उपेक्षा आणि वंचना यातून हा समाज सर्वस्वाने उद्धवस्त झाला होता. या समाजाचा आत्मविश्वास मारण्यात आला होता. विचार शक्ती खुंटवण्यात आली होती. यामुळे आपल्या प्रारब्धाला दोष देत हा समाज अनेक शतकापासून गुलामगिरीचे जीवन जगत, अस्पृश्यतेचे चटके सहन करत, पावलोपावली अपमानाचे विष पचवत होता. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या विश्ववंद्य प्रज्ञावंतांनी या अस्पृश्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले. व्यवस्थेवर घाव घालून ही सनातन व्यवस्था उद्ध्वस्त केली. गुलामगिरीच्या जोखडातून तमाम शूद्रांना मुक्त करण्याचा सर्वंकष प्रयत्न केला. बाबासाहेबांनी वंचितांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पेरला व सनातन रुढी परंपरेला तिलांजली देऊन मानवतावादी मूल्यांची रूजवणक केली, यातून वंचित समूहातून अण्णाभाऊ सारखे प्रतिभावंत कलावंत उदयाला आली. बाबासाहेबांनी समाजमनात रूजवलेल्या क्रांतिकारी विचाराचे पहिले वाङ्मयीन फलित म्हणजे अण्णाभाऊंचे साहित्य होय. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे चालण्याचे उत्तरदायित्व अण्णाभाऊंनी स्वयंस्फूर्तपणे स्वीकारले. आपली प्रतिभा बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचाराच्या प्रसारार्थ वाहिली. 6 डिसेंबर 1956 रोजी बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले. त्यानंतर अंधेरी येथे महाराष्ट्रातील कलावंतांच्या वतीने काव्यातून श्रद्धांजली

देण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात बाबासाहेबांना काव्यातून आदरांजली व्यक्त करण्यासाठी अण्णाभाऊंनी लिहिलेले ते गीत म्हणजे 'जग बदल घालुनी घाव' होय. या गीतातून बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचारांचा वारसा पुढे चालवत, त्यांच्या स्वप्नातील नवा समाज निर्माण करणार असल्याचे सांगतात.

जग बदल घालुनी घाव ।
सांगून गेले मला भीमराव ।।

या जगातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी व्यवस्थेवर पहिला घाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घातला. बाबासाहेबांच्या या क्रांतीने देशातील तमाम वंचितांचे जीवन ढवळून निघाले. अण्णाभाऊ बाबासाहेबांना गुरुस्थानी मानतात. त्यांचेच उर्वरित कार्य पूर्णत्वाला नेण्यासाठी आपले जीवन वाहणार असल्याचे येथे घोषित करतात. क्रांतीचा मंत्र बाबासाहेबांकडून आपल्याला मिळाल्याची कबुली देतात. बाबासाहेबांच्या पूर्वी वंचित अस्पृश्य समाजाची जी दैनिय अवस्था होती, त्याचा आढावा अण्णाभाऊंनी आपल्या कवितेतून घेतलेला आहे. व्यवस्थेने दलित समाजाचे कर्तृत्व मारून त्यांचे शोषण करण्यासाठी जाणीवपूर्वक गुलामगिरीच्या चिखलात रुतवले, असे अण्णाभाऊंचे म्हणणे आहे.

गुलामगिरीच्या या चिखलात ।
रुतून बसला का ऐरावत।।

वंचित समाजाच्या सामर्थ्याचे वर्णन करताना अण्णाभाऊंनी येथे पौराणिक प्रतीकांचा समर्पकपणे वापर केला आहे. इंद्राच्या दरबारात जो प्रचंड सामर्थ्यसंपन्न हत्ती होता, त्याचे नाव ऐरावत होते. गुलामगिरीच्या चिखलात रुतलेला वंचित समाज हा ऐरावता सारखाच सामर्थ्यसंपन्न असल्याचे अण्णाभाऊ सांगतात. सनातन व्यवस्थेने या समाजाला वर्णव्यवस्थेच्या नावाखाली गुलामगिरीच्या चिखलात रुतवल्यामुळे या समाजाचे कर्तृत्वच लोप पावले, अशी

वंचितांच्या मागासलेपणाची विवेकनिष्ठ कारणमीमांसा अण्णाभाऊ मांडतात. म्हणजेच एका अर्थाने बाबासाहेबांच्या विचारांची पुनर्मांडणीत ते या कवितेतून करतात. बाबासाहेबांनी गुलामगिरीच्या चिखलातून या वंचितांना बाहेर काढण्यासाठी क्रांतीचा उद्घोष केला. बाबासाहेबापासून प्रेरणा घेऊन दलित समाजाने गुलामगिरीच्या चिखलातून बाहेर पडण्यासाठी अंग झटकले पाहिजे. म्हणजेच व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारून कालबाह्य रूढी-परंपरांना मूठमाती दिली पाहिजे. बाबासाहेबांच्या क्रांतीचा वारसा पुढे चालवला पाहिजे. असे अवाहन अण्णाभाऊ या कवितेतून करतात.

अंग झाडुनी निघ बाहेर ।  
घे बिनीवरती घाव ।।

वंचितांचे शोषण आजपर्यंत अनेक स्तरावर झाल्याचे अण्णाभाऊ निदर्शनास आणून देतात. या देशातील धर्ममार्तंडांनी धर्माच्या नावाखाली काही जातींना अस्पृश्य ठरवून पावलोपावली छळले होते. धनसत्ता हातात असलेल्या धनवंतांनी अखंडितपणे अस्पृश्यांचे निरंतर शोषण केले. त्यातून दलित समाज आर्थिकदृष्ट्या रसातळाला गेला. याचेच वर्णन महात्मा फुल्यांनी 'वित्ताविना शूद्र खचले' असे केले होते. वंचितांना अज्ञानात ठेवून त्यांचे आर्थिक शोषण केल्यामुळे समाजात मोठी दरी निर्माण झाली. म्हणून देशाला स्वातंत्र्य मिळूनही येथील वंचित समाज हा विविध संधी पासून उपेक्षितच राहिला. म्हणून अण्णाभाऊंनी 'ये आझादी झुठी है । देश कि जनता भुकी है।' असा नारा दिला होता. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक समानता आली पाहिजे याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते. लोकशाही राष्ट्र म्हणून आपण वाटचाल सुरू केली तेव्हाच डॉक्टर आंबेडकर म्हणाले होते. "देशात राजकीय व सामाजिक स्तरावर लोकशाही आपण आणत आहोत पण आर्थिक स्तरावर ती आणता आली नाही तर या देशात खरीखुरी लोकशाही नांदणार नाही" आंबेडकरांनी दिलेला हा इशारा दिवसेंदिवस खरा ठरत आहे. समाजातील विविध घटकांनी वेगवेगळ्या पद्धतीने दलित समाजाला देशोधडीला लाऊन स्वतः मात्र नामानिराळे

असल्याचा भास निर्माण केला. मगरीने समुद्रातील माणिक गिळून आपण काहीच खाल्ले नाही, असे दाखवावे. त्याप्रमाणे दलितांचे शोषण करून सर्व शोषक निष्पाप साधूत्वाचे मुखवटे धारण केले, असे अण्णाभाऊ सांगतात.

धनवंतांनी अखंड पिळले l धर्मांधांनी तसेच छळले।।
मगराने जणू माणिक गिळले l चोर जाहले साव ।।

धर्मव्यवस्थेने शूद्रांना हिन आणि कलंकित लेखले. साध्या माणुसकी पासूनही वंचित ठेवले. पिढ्यानपिढ्या पासून अस्पृश्यतेच्या नावाखाली गुलाम बनवले. अपमानित जीवन जगायला भाग पाडले. यामुळे हजारो वर्षापासून वंचित समाज अस्पृश्यत्वाच्या दाहक वेदना मुकपणे सहन करत अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडत होता. कोणताही गुन्हा न करता अपमानाचे विष पदोपदी पचवत होता. माणसामाणसात जातिव्यवस्थेच्या नावाखाली जी दरी निर्माण केली होती, त्यावर भाष्य करतांना अण्णाभाऊ म्हणतात,

ठरवून आम्हा हीन कलंकित l जन्मोजन्मी करुनी अंकित ।।
जिणे लादूनी वर अवमानित l निर्मुन हा भेदभाव ।।

या गुलामगिरीच्या अस्पृश्यतेच्या चिखलातून बाहेर पडण्यासाठी आता बाबासाहेबांचा मार्ग अनुसरला पाहिजे. बाबासाहेबांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा जो संदेश दिला होता, तो वंचितांनी अंगिकारला पाहिजे, असे अण्णाभाऊंना वाटते. म्हणून तमाम वंचितांना एकजुटीच्या रथावर अरुढ होण्यासाठी ते आव्हान करतात. एकत्र येऊन व्यवस्थेच्या विरुद्ध संघर्ष करीत आपली पुढील वाटचाल करणे गरजेचे असल्याचे ते सांगतात. आधुनिक महाराष्ट्र घडवण्यासाठी बाबासाहेबांनी सांगितलेले स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा अंगिकार केला पाहिजे. पुरोगामी विचारांचा नवा महाराष्ट्र घडवून जगाच्या मनःपटलावर महाराष्ट्राचे नाव कोरले पाहिजे. अशी अपेक्षा अण्णाभाऊ या कवितेच्या शेवटी व्यक्त करतात.

एकजुटीच्या या रथावरती l आरूढ होऊनी चल बा पुढती ।।

नव महाराष्ट्र निर्मून जगती । करी प्रकट निज नाव ।।

अशा प्रकारे अण्णाभाऊंनी 'जग बदल घालुनी घाव' या कवितेतून बाबासाहेबांच्या परिवर्तनवादी विचारांची जी मांडणी केली, त्यातून त्यांची बाबासाहेबांच्या विचारावरील दृढनिष्ठा लक्षात येते. या देशातील तमाम वंचितांच्या जीवनाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य हे केवळ बाबासाहेबांच्या विचारात आहे, त्यामुळे त्यांचे विचार अंगीकारणे गरजेचे असल्याचे अण्णाभाऊंनी या कवितेतून सुचित केले आहे.